सम्यक


संवाद व संसाधन केंद्र, पुणे

# मर्जी

## माझ्या शरीरावर माझा हक्क

जुलै ते सप्टेंबर, २०१५
अंक पहिला

## खरंच की !



घ्या... कुणाचं काय तर कुणाचं काय !

साभार : www.tumblr.com

## डोकावून पहा


- संपादकीय ....१
- 'मर्जी' माझ्या शरिरावर माझा हक्क! ...२
- **विवेचन**
  आपल्याला मुली नेमक्या का हव्या आहेत? ...३
- **इतिहासाच्या झरोक्यातून**
  "टाळी एका हाताने वाजत नाही, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो" ...४
- **प्रतिक्रिया**
  चळवळीतील साथीदार ...५
- **वार्तांकन**
  असा झाला प्रवास सुरु... तुम्हीही सामिल व्हा! ...६
- **आम्ही कुठं जायचं?** ...७
- **मर्जी हॉटलाईन बद्दल** ...८


## संपादकीय

हक्काधारित आरोग्याची व आरोग्यसेवांच्या मागणीची चर्चा सार्वजनिक आणि व्यापक करण्यामध्ये महाराष्ट्रात विविध वार्तापत्रांनी नेहमीच महत्त्वाचे काम केले आहे. याच परंपरेचा एक भाग म्हणून 'मर्जी: माझ्या शरीरावर माझा हक्क' हे स्त्रीवादी त्रैमासिक आपल्या हातात देताना आम्हाला आनंद होत आहे. स्त्रियांच्या लैंगिक व प्रजनन हक्कांविषयीच्या चर्चेमध्ये व धोरणे ठरताना 'माझ्या शरीरावर माझा हक्क' या स्त्रीवादी घोषणेचा मोठा प्रभाव राहिला. भारतामध्ये तर या घोषणेचा पुनरुच्चार करणे नजीकच्या काळात गरजेचे झाले आहे. पितृसत्तेने धर्म-परंपरांच्या नावाखाली स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि प्रजननावर नेहमीच नियंत्रण ठेवले आहे. स्त्रियांनी किती अपत्यांना जन्म द्यावा हे आजही धर्म-परंपरावादी कधी थेट तर कधी आडून-आडून सांगत आहेत. 'भ्रूण-हत्या' सारख्या शब्दांचा वापर करून सरसकटपणे स्त्रियांना गर्भसमाप्तीच्या (काही विशिष्ट परिस्थितीतील) कायदेशीर अधिकारांपासूनही वंचित ठेवले जात आहे. एकुणातच आपल्याकडे गर्भसमाप्तीकडे कलंकित नजरेतून पाहिले जाते, त्यातच एकीकडे परंपरावादी विचार तर दुसरीकडे 'भ्रूण-हत्या' शब्दांतून ध्वनीत होणाऱ्या 'गर्भसमाप्ती म्हणजे हत्या' या अर्थामुळे दिवसेंदिवस स्त्रियांना गर्भसमाप्तीच्या सुरक्षित सेवा मिळणे दुरापास्त झाले आहे. यामध्ये शहरी-गरीब व ग्रामिण स्त्रियांची अवस्था मात्र दारुण झाली आहे. अर्थात, या प्रश्नाचे अनेकविध पैलू चर्चेसाठी पुढे आले पाहिजेत. मुलींची घटती संख्या, त्यामागे तंत्रज्ञानाच्या मार्केटचे असलेले आर्थिक हितसंबंध, भांडवली व्यवस्थेला व पितृसत्तेला बळकटी देणारी सद्यस्थिती, स्त्रियांचे केवळ उपयोगीतामुल्य समोर मांडणारी विविध अभियाने, खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची आरोग्यसेवा पुरविण्यामध्ये किंवा नाकाराण्यामध्ये असलेली भूमिका, गर्भसमाप्तीकडे पहाण्याचा समाजाचा कलंकित दृष्टीकोण इत्यादी अनेकविध पैलूंचा स्त्रियांच्या सुरक्षित गर्भसमाप्तीच्या सेवांवर काय परिणाम होत आहे याची चर्चा पुढील अंकांमधून आपण करणारच आहोत. या अंकामध्ये यापैकीच काही मुलभूत मुद्दे मांडले आहेत.

पुरोगामी व लोकशाहीवादी संस्था-संघटनांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यामध्ये आजवर वार्तापत्रांचा मोठा सहभाग राहिला आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आता मोठ्या प्रमाणात वार्तापात्रांच्या 'ई-प्रती' तयार होतात, मात्र अद्यापही गाव-खेड्यात काम काणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंत या 'ई-प्रती' पोहोचतातच असे नाही. त्यामुळे छापील वार्तापत्रांचे महत्त्व अजुनही तितकेच आहे. म्हणून 'मर्जी' चे छापील अंक प्रकाशित करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे.

पुढील अडीच वर्षांच्या या प्रवासात या त्रैमासिक वार्तापत्रातून आपणा सर्वांना संवादाची व सहभागाची संधी उपलब्ध होणार आहे. शिवाय या विषयीचे आपले लिखाण, चित्रे, कविता, अभ्यास निबंधाचेही स्वागतच असेल.

# ‘मर्जी’ माझ्या शरिरावर माझा हक्क!

मुळात उर्दू उगमस्थान असलेल्या ‘मर्झी’ या शब्दाचा उच्चार मराठीमध्ये ‘मर्जी’ असा केला जातो. अनेक लोकांच्या बोलण्यात येणारा हा शब्द इच्छा ठामपणे दर्शवणारा आहे. उदा. अनेकजण सर्रासपणे ‘माझी मर्जी’ हे वाक्य वापरतात. त्या व्यक्तीशी संबंधीत कोणत्याही गोष्टी संदर्भात असणारा हक्क व्यक्त करणारे हे वाक्य आहे असे समजले जाते. या संवादपत्राला ‘मर्जी’ हे नाव देण्यामागे असाच काहीसा हेतू आहे.

‘माझ्या शरीरावर माझा हक्क’ ही स्त्रीवादी चळवळीने दिलेली घोषणा स्त्रियांचा त्यांच्या शरीरावर हक्क असायला हवा आणि त्या संबंधातील सगळे निर्णय त्यांना घेता यावेत यासाठी पितृसत्ताक समाज व्यव्यस्थेविरुद्ध उचलेले महत्त्वपूर्ण पाउल होते. माझ्या शरीराचे, विशेषत: गर्भाशयाचे, काय करायचे हे ठरविण्याचा संपूर्ण हक्क प्रत्येक स्त्रीला असायला हवा आणि ते निर्णय घेण्याची क्षमता तिच्यामध्ये तयार व्हावी या ‘राजकीय’ भूमिकेला ‘सम्यक’चा कायमच पाठिंबा राहिलेला आहे आणि म्हणूनच या संवाद पत्राला ‘मर्जी: माझ्या शरीरावर माझा हक्क’ हे नाव देण्याचे आम्ही ठरवले.

या संवादपत्रामार्फत सुरक्षित गर्भसमाप्ती आणि स्त्रियांच्या प्रजनन आरोग्यासंदर्भात असणारे अनेक पैलू स्त्रीवादी दृष्टिकोनातून उलगडण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. ‘माझ्या शरीरावर माझा हक्क’ या घोषणेचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर समाजामध्ये पसरावे आणि त्याप्रमाणे अनेक स्त्रियांना त्यांच्या शरीरासंदर्भातील निर्णय घेण्याच्या संधी निर्माण व्हाव्यात हा या प्रयत्नांमागचा हेतू !

पुढील २ वर्षे, हे संवादपत्र दर तीन महिन्यांनी प्रकाशित केले जाईल. संवादपत्राबद्दलच्या आपल्या प्रतिक्रियाचे स्वागत

> कोणीही महिला स्वत:ला तोवर स्वतंत्र म्हणवू शकणार नाही जोवर आई व्हायचं की नाही हे ती स्वत: ठरवू शकणार नाही.
>
> **डोरोथी पार्कर**

> जर पुरुष गरोदर राहायला लागले तर गर्भसमाप्ती पवित्र मानली जाईल.
>
> **फ्लोरेन्स कॅनेडी**




सांगली येथे मर्जी हॉटलाईन उद्घाटन प्रसंगी
डॉ. कोळी – आर.एम.ओ., डॉ. माणिक सांगळे – सिव्हील सर्जन,
ॲड. अर्चना उबाळे – विधी तज्ज्ञ, पीसीपीएनडीटी,
सोबत डॉ. गोरख मंद्रुपकर व आनंद पवार



औरंगबाद जिल्ह्यात सेवा पुरवठादारांच्या बैठकीमध्ये
उजवीकडून डॉ. परदेशी – अध्यक्ष, ओबीजीवाय सोसा.,
डॉ. गोरख मंद्रुपकर, डॉ. जी. एन. गायकवाड – सिव्हील सर्जन,
डॉ. संध्या टाकळीकर – पीसीपीएनडीटी, समुचित अधिकारी,
डॉ. ललीता बजाज-सेक्रटरी, ओबीजीवाय सोसा., प्रितम पोतदार




सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था संघटनांच्या बैठकीमध्ये
मार्गदर्शन करताना डॉ. एम. आर. पट्टनशेट्टी – सिव्हील सर्जन,
डॉ. शशिकांत अहंकारी – हॅलो मेडीकल फाऊंडेशन

# आपल्याला मुली नेमक्या का हव्या आहेत ?



– मिलिंद चव्हाण
milindc70@gmail.com

### ‘मुलगाच हवा’ ही मानसिकता

खरे तर ज्या समाजात विवाहित जोडप्याला ‘पेढे कधी देणार?’ असाच प्रश्न विचारला जातो (बर्फी, जिलेबी, साखर मात्र कधीही मागितली जात नाही!), विवाहित स्त्रीला ‘अष्टपुत्रासौभाग्यवतीभव’ असाच आशिर्वाद दिला जात असे (‘अष्टकन्या’ नाही, शिवाय तो मिळण्यासाठी ती विवाहिता ‘नांदती’ आणि तिचा नवरा जिवंत असणे ही ‘पात्रता’ ही लागते!), जिथे पुत्रप्राप्तीसाठी ‘पुत्रकामेष्टी’ यज्ञ केले जात होते (अजूनही क्वचित केले जातात!) आणि मुलींना जन्मत:च दुधात बुडवून मारण्याची प्रथाही होती, त्या समाजात यापेक्षा वेगळे काय घडणार होते? त्यामुळेच, आता या मुद्द्याबद्दल मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू असली तरी ती फक्त गर्भलिंगनिवडीभोवतीच फिरत राहणे आणि ज्या टोकाच्या विषम व्यवस्थारूपी ‘आजारा’चे ते केवळ एक ‘लक्षण’ आहे, त्या व्यवस्थेबद्दलची आणि ती बदलण्याची चर्चाही दृष्टीपथात नसणे, हे या कमालीच्या पुरुषप्रधान समाजाला साजेसेच आहे.

### स्त्रियांकडे पाहण्याचा ‘उपयुक्ततावादी’ दृष्टिकोन

या सर्व चर्चेत मुळात मुली ‘नकोशा’ का होतात आणि त्यांना ‘परक्याचं धन’ मानणारी मानसिकता कशी बदलायची याचाही विचार गरजेचा आहे. गर्भलिंगनिदानापासून लोकांनी परावृत्त व्हावे म्हणून ज्या जाहिराती सरकारमार्फत केल्या जात आहेत त्यात, ‘बायको हवी, सून हवी, मग मुलगी का नको?’ असा प्रश्न केलेला दिसतो. खरे तर, स्त्रिया-मुलींकडे प्रथम ‘माणूस’ म्हणून न बघता ‘कामाचे’ आणि ‘मूल जन्माला घालण्याचे यंत्र’ तसेच ‘पुरुषाच्या लैंगिक सुखाचे साधन’ म्हणून बघणारी मानसिकताच स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला व पर्यायाने गर्भलिंगनिदानाला कारणीभूत आहे आणि नेमका याच दृष्टिकोनाचा प्रसार या जाहिरातींमार्फत होतो आहे. स्त्रियांकडे बघण्याच्या या ‘उपयुक्ततावादी’ दृष्टिकोनामुळेच ‘मुलींना सकस आहार द्या, कारण त्या उद्याच्या माता आहेत’ असे म्हटले जाते! एखाद्या स्त्रीला माता व्हायचे नसेल तर मग या दृष्टिकोनानुसार तिला सकस आहाराचा हक्कच नसणार! आणि एकदा का ती माता बनली की नंतर तिची उपासमार केली तरी चालणार!!

‘एक स्त्री शिकली की एक कुटुंब शिकते’ हा युक्तिवाद दीडशे वर्षांपूर्वी गरजेचा होता पण आजही मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवण्यासाठी तो वापरायची गरज का पडावी? म्हणूनच, ती ‘उद्याची माता’ वगैरे आहे किंवा नाही हा मुद्दाच नसून अन्न, आरोग्य, शिक्षण, रोजगार हे मूलभूत मानवी हक्क आहेत (कायद्यात तसे ते नमूद आहेत का आणि असले किंवा नसले तरी अंमलबजावणीचे काय हे आणखी निराळे मुद्दे!) आणि ‘माणूस’ म्हणून पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही ते प्राप्त झाले पहिजेत, असा तर्कशुद्ध युक्तिवाद असला पाहिजे. त्याच चालीवर, ‘उद्या बायको किंवा सून कशी मिळणार?, म्हणून मुलींना जन्माला येऊ द्या’ असे म्हणणे ‘उपयुक्ततावादी’ असून ‘मुलाइतकाच मुलीला जन्माला येण्याचा हक्क आहे, म्हणून मुली जन्माला आल्या पाहिजेत’ हा युक्तिवाद असला पाहिजे. लिंग गुणोत्तर अतिशय कमी असलेल्या महाराष्ट्रातील एका जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना लिंगनिदानविरोधी अभियानामध्ये लोकांना ‘मुलींना जन्माला येऊ द्या’ हे पटवून कसे द्यावे, हा प्रश्न पडला होता आणि ‘...मग शेतातील कामे कोण करणार?’ हे ‘उपयुक्ततावादी’ कारण त्यांनी शोधले होते, कारण त्याशिवाय दुसरा पर्यायच त्यांच्यासमोर नव्हता!! शेतीतील ८०% कामे स्त्रिया करत असूनही सात-बाराच्या उताऱ्यावर त्यांचे नाव नसण्यात आणि स्त्रिया संपत्तीपासून वंचित असण्यात स्त्रियांच्या दुय्यमतेचे मूळ आहे या वास्तवापासून आपला समाज दूर असल्याचे हे निदर्शक होते.

### हुंडा-बालविवाह आणि लिंगनिदान

‘मुली नकोत’ अशी मानसिकता होण्यामागे ‘हुंडा’ हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे दिसते. मुलगी म्हणजे ‘देणे’ आणि मुलगा म्हणजे ‘येणे’ असा सरळ हिशेब त्यामागे आहे! लग्नात मुलीच्या अंगावर घातलेल्या सोन्याच्या तोळ्यांचा केवळ आकडा ऐकूनही भोवळ यावी अशी परिस्थिती आहे!! अर्थात, नव उदारवादी धोरणांमुळे जमिनीला आलेल्या प्रचंड भावातून हा पैसा येत असला आणि प्रत्येक लग्नात इतका प्रचंड खर्च केला जात नसला तरी ‘ऐपतीप्रमाणे’(?) खर्च केला जातोच! ‘आपल्या घरातील लग्नही असेच थाटामाटात झाले पाहिजे’ अशी भावना निर्माण होऊन प्रसंगी त्यासाठी कर्जही काढले जाते आणि त्यातूनच ‘मुलगी म्हणजे डोक्यावरचे ओझे’ ही भावना बळावते. शिवाय भरपूर हुंडा देऊन सासरी पाठवल्या गेलेल्या मुलीचा छळ सुरू झाल्यास ती माहेरी ताबडतोब सांगू शकत नाहीच, उलट

कोणत्याही परिस्थितीत लग्न टिकवण्याचा तिच्यावरील दबाव आणखी वाढतो. त्यामुळेच, लिंगनिदान थांबण्यासाठी हुंडा देणे-घेणेही थांबले पाहिजे. त्यासाठी बिगरहुंडा, सामुदायिक व कमी खर्चात लग्ने झाली पहिजेत आणि हुंड्याऐवजी मुलीचा संपत्तीतील हक्क मान्य होऊन त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. तसे झाल्यास सासरी तिच्यावर होणारी हिंसा कमी होण्याची शक्यता निर्माण होईल.

मुलगी शिकलेली आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असेल तर तिच्याकडून लिंगनिदानाला आणि ‘मुलीच होतात’ या किंवा इतर कारणांवरून होणाऱ्या हिंसेला विरोध होण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे, मुलींचे शिक्षण पूर्ण होऊन त्यांनी आत्मनिर्भर व्हावे, त्यांचे लहान वयात लग्न होऊ नये हे ही पाहिले पाहिजे. कुटुंबात, गाव-वस्ती पातळीवर याची चर्चा घडवत असतानाच, याबाबतच्या कायद्यांची भ्रष्टाचारविरहित काटेकोर अंमलबजावणी होणेही तितकेच गरजेचे आहे.

### मुली कशासाठी पाहिजेत?

गर्भलिंगनिदानाचा मुद्दा असा हुंडा, बालविवाह, स्त्रियांवर होणारी हिंसा, स्त्रियांचा मालमत्तेचा हक्क वगैरेशी निगडित आहे. डॉक्टरांवर कारवाई होण्याचा आणि सरकारने त्यासाठी व समानतेच्या इतर मुद्द्यांसंदर्भात इच्छाशक्ती दाखवण्याचा आग्रह धरतानाच मुद्द्याची सर्वांगीण चर्चा होऊन प्रत्येकाने त्यादृष्टीने कार्यरत होणे आवश्यक आहे. म्हणूनच, कोणाच्या तरी ‘वंशाला दिवा’ (!) देण्यासाठी वा कोणाला तरी बायको किंवा सून मिळण्यासाठी मुली हव्या आहेत की निखळ ‘माणूस’ म्हणून, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

**(हा लेख यापूर्वी दै. सकाळ या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेला आहे)**

■■■

## इतिहासाच्या झरोक्यातून

# ‘‘टाळी एका हाताने वाजत नाही, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो’’



**दिपाली कांबळे**
समन्वयक - सम्यक




**ताराबाई शिंदे** या मूळच्या विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील होत्या. त्यांचे वडील बापूजी शिंदे हे ज्योतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतील एक कार्यकर्ते होते. त्यामुळे लहानपणापासूच ताराबाई शिंदे यांच्यावर ज्योतीराव फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता.

ताराबाई शिंदे या एकोणिसाव्या शतकातील स्त्री-पुरुष समानतेविषयी मांडणी करणाऱ्या पहिल्या मराठी स्त्रीवादी लेखिका. त्यांचे १८८२ साली लिहीलेले ‘स्त्री-पुरुष तुलना’ हे मराठीतील पहिले लेखन आहे ज्यात एका स्त्रीने निर्भीडपणे आणि परखड शब्दांत समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायासंबंधी पुरुषांना सरळ-सरळ प्रश्न विचारले. या पुस्तकातून विधवा पुनर्विवाहवरील बंधने, स्त्रियांचे कुटुंब आणि समाजातील दुय्यम स्थान व स्त्रीला दैनंदिन जीवनात भोगावे लागणारे अन्याय अशा अनेक प्रश्नांची मांडणी करून पुरुषसत्ताक व्यवस्थेला आव्हानच दिले.

‘स्त्री-पुरुष तुलना’ या पुस्तकाच्या संदर्भात ‘विजयालक्ष्मी केस’ हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. सुरत येथील विजयालक्ष्मी ही ब्राह्मण कुटुंबातील विधवा स्त्री गरोदर राहिली आणि समाजाच्या दबाव आणि भीतीमुळे तीला गर्भपात करावा लागला. यावर सुरत न्यायालयाने तिला फाशीची शिक्षा सुनावली. परंतु तिने मुंबई न्यायालयात अपील केल्यामुळे पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली गेली. दरम्यान या केससंबंधीच्या स्त्रीजाती विरोधातील बातम्या ‘टाइम्स ऑफ इंडिया’ व ‘पुणे वैभव’ यांसारख्या वृत्तपत्रातून छापून आल्या. यामुळे स्त्रियांच्या विरोधातील टीकेचे वातावरण समाजामध्ये निर्माण झाले, त्यामुळे या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून लिहिल्या गेलेल्या ताराबाई शिंदे यांच्या ‘स्त्री-पुरुष तुलना’ या लेखनाला विजयालक्ष्मीची केस एक महत्त्वाचे निमीत्त ठरते.

या केस विषयी मांडणी करताना ताराबाई शिंदे म्हणतात, ‘‘रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगाबाजीची नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असतानाही तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात, हे पाहून स्त्रीजात्याभिमानाने माझे मन अगदी खळबळून, तळतळून गेले. त्यामुळे मला निर्भीड होऊन असेच खडखडीत शब्दात लिहिल्या वाचून राहवेना.’’ बाईचं पाऊल ‘वाकडं’ पडतं याला पुरूषच बहुधा जबाबदार असतात, असा युक्तिवाद करताना त्या म्हणतात, ‘‘टाळी एका हाताने वाजत नाही, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो.’’ या निबंधात त्यांनी स्त्रियांना दिले जाणारे सारे दोष स्त्रियांपेक्षा पुरुषांतच कसे जास्त आहेत आणि काही स्त्रियांत असे दोष आढळले तरी ते पक्षपाती, अनिष्ट रूढींमुळे आणि प्रचलित पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळेच कसे निर्माण झाले आहेत हे परखडपणे मांडले आहे.

ताराबाईंचे हे विचार आजच्या परिस्थितीलाही तंतोतंत लागू आहेत असे म्हणल्यास गैर ठरणार नाही.

(संदर्भ: विलास खोले संपादित ‘स्त्री-पुरुष तुलना’)

■■■

# चळवळीतील साथीदार





## सुनीता गांधी

**(स्त्रीवादी कार्यकर्त्या, विश्वस्त 'संवाद' चिपळूण)**

सन २००० च्या आसपास 'संवाद' मार्फत 'लोकसंख्या नियंत्रणाचे सरकारी धोरण आणि महिला आरोग्य' या विषयावर काम करताना सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्याला स्पर्श झाला. मात्र या मुद्द्यावर अधिक सजगता निर्माण झाली ती २००६ मध्ये महाराष्ट्रभर घेण्यात आलेल्या 'सेहत' च्या 'मुक्ता' या कार्यशाळेतून! त्यानंतर दिल्लीच्या- 'क्रिया'च्या कार्यशाळेतून या 'सुरक्षित गर्भपाताच्या सेवे' चे वास्तव आणि त्याला असणारे विविध पैलू अधिक प्रकर्षाने समोर आले.

आज सर्वाधिक गोंधळ दिसतो तो PCPNDT आणि MTP Act समजून घेण्यात व त्याची अंमलबजावणी करण्यात. प्रत्यक्षात स्वतंत्र असणारे आणि महिलांच्याच हिताचे असलेले दोन्ही कायदे सरमिसळ करून समाजापुढे आणले जातात. त्यात भर पडते ती प्रचारी स्वरूपाच्या 'स्त्री-भ्रूणहत्या, आई, बहिण, बायको पाहिजे, मुलगी का नको?' यांसारख्या शब्दांनी सजवलेल्या जाहिरातींची. गर्भलिंगनिदान सारख्या शब्दाचा आग्रह चळवळींनी धरला तर अगदी प्रसार माध्यमेही तुम्ही शब्दच्छल करता आहात असा आक्षेप घेतात. पण त्यामागची भूमिका आणि बाईचं माणूस म्हणून जन्माला येणं - जगणं हेच नाकारलं जातंय याचा साधा विचारही त्यांना करावासा वाटत नाही.

आपल्याकडे गर्भपाताचे उदार धोरण आणि कायदा असला तरी त्याला 'हक्क' म्हणता येत नाही. गोपनीय, सहज, मोफत आणि सुरक्षित गर्भपात सेवा जर प्रत्यक्षात यायची असेल तर गर्भपात हा स्त्रियांचा हक्क म्हणून मान्यता पावला पाहिजे. त्याचबरोबर इतर आरोग्य अधिकार प्रत्यक्षात आले तर गर्भपाताच्या हक्काचा स्त्रियांना वापर करावा लागणार नाही पण जर वेळ पडली तर तो त्यांना त्यांच्या मर्जीने वापरताही येईल.

---



## डॉ. गोरख मंद्रुपकर

**(स्त्री-रोग तज्ज्ञ, इस्लामपूर, Ex-FOGSY Chairman)**

MTP Act १९७१ नुसार जरी गर्भपात हा भारतीय महिलांचा मुलभूत हक्क नसला तरी सुरक्षित गर्भपात हा मात्र त्यांचा हक्क आहे. स्त्री-पुरुष समानतेपेक्षा ० ते ६ वयोगटाच्या लिंग गुणोत्तराला अवास्तव महत्त्व दिले गेल्याने समाजात दोन गोष्टी प्रकर्षाने झाल्या.

१. स्त्री-पुरुष समानता दूरच आणि स्त्रीजन्म हाच नकारात्मक दृष्टिक्षेपात आला.
२. PCPNDT कायद्याच्या चुकीच्या अंमलबजावणी पद्धतीमुळे गर्भलिंग निदानापेक्षा'गर्भपात' या मुद्द्यावर ही चळवळ केंद्रित होऊ लागली.

आणि याचा परिपाक म्हणून की काय वैद्यकीय क्षेत्रात पसरलेल्या घबराटीमुळे आणि अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे कायदेशीर व अत्यंत निकडीचे गर्भपात देखील नाकारले जाऊ लागले आहेत. असुरक्षित गर्भपातामुळे माता-मृत्यू व एकंदरीत आजारपणे वाढू लागली आहेत. हे थांबवायचे असेल तर,

१. गर्भलिंगनिदानाला प्रखर विरोध
२. PCPNDT व MTP कायद्यांची- कायदेशीर अंमलबजावणी आणि
३. सुरक्षित गर्भपाताची सेवा, माहिती व उपलब्धता यांचा पाठपुरावा करावा लागेल.

सुरक्षित गर्भापाताकरीता 'सम्यक' बरोबर काम करताना या विषयाचे गांभीर्य आणखीनच समजले. स्वत: एक स्त्री-रोग तज्ज्ञ या नात्याने care provider च्या भूमिकेबरोबर या चळवळीत महाराष्ट्रातील स्त्री-रोग तज्ज्ञ, पत्रकार, आरोग्याधिकारी यांच्याबरोबर होणाऱ्या संवादांमुळे खरोखरीच फरक पडू लागला आहे याचे समाधान आहे.

---



## वसीम मणेर

**(सिनेमा दिग्दर्शक, फलटण)**

स्त्री-पुरुष समानतेविषयी एक basic sensitivity पहिल्यापासूनच होती. त्यामुळे या क्षेत्रात काही करता येईल का यासाठीचे प्रयत्न माझ्याकडून सतत चालूच होते. याच काळात मी आनंदला (पवार) भेटलो, त्याच्यामुळे विषयाची समज वाढली. जेव्हा सुरक्षित गर्भपात या विषयाबद्दल समजलं तेव्हा वाटलं की या संदर्भात मी मोठी भूमिका पार पाडू शकतो. म्हणून मी या विषयाशी जोडला गेलो.

'सुरक्षित गर्भपात' या मुद्द्यावर काम करणे मला महत्त्वाचे वाटते कारण, स्त्रियांकडे स्वतंत्र माणूस म्हणून पाहण्याची गरज आहे आणि त्यासाठी पुरुषांनी भूमिका घ्यायला हवी. आज अशी परिस्थिती आहे की, बाईकडे मशीन म्हणून बघितले जाते आणि त्यामुळे घरकाम, धुणी-भांडी आणि मुलांना जन्म घालणे इतकेच महत्व तिला दिले जाते. स्त्रीच्या शरीरावर तिचा हक्क आहे आणि तिच्या शरीरात होणाऱ्या बदलांसंदर्भातील सर्व निर्णय तिला घेता आले पाहिजेत. सुरक्षित गर्भपात हा त्यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. आपल्या पुरुषसत्ताक पध्दतीत आणि स्वस्त आणि सुरक्षित वैद्यकीय सुविधांच्या अभावग्रस्त देशामध्ये हे काम जास्त निकराने करण्याची गरज आहे असे मला वाटते.

# असा झाला प्रवास सुरु... तुम्हीही सामिल व्हा !

वार्तांकन



**प्रितम पोतदार**
समन्वयक - सम्यक

स्त्रियांच्या आरोग्यहक्कासंदर्भात महाराष्ट्रातील अनेक छोट्या शहरांमध्ये सम्यक मार्फत विविध प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवले जातात. स्त्रियांचे आरोग्य सुधारावे, त्यांना स्वत:च्या शरीराविषयी निर्णय घेता यावेत व त्यासाठी बिनधोक व संवेदनशील आरोग्यसेवा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने मागील आठ वर्षांपासून सम्यक प्रयत्न करते आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी, २०१२ पासून पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागांमधील १० जिल्ह्यांमध्ये लिंगनिदानाला विरोध करत असतानाच सुरक्षित गर्भपाताच्या सेवा महिलांना मिळाव्यात यासाठी काही प्रयत्न सम्यक मार्फत सुरू करण्यात आले. या प्रक्रियेअंतर्गत लिंगनिदान आणि सुरक्षित गर्भपात या संदर्भातील पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती काय आहे हे समजून घेण्यासाठी एक संशोधन करण्यात आले. या अभ्यासाच्या आधारावर सरकारी यंत्रणा, सरकारी आणि खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व पत्रकार आणि स्वयंसेवी संस्थांबरोबर advocacy करणे हा या मागचा प्रमुख उद्देश आहे.

### प्राथमिक काळातील काही निरीक्षणे:

सम्यक मार्फत आरोग्याच्या मुद्द्यांवरती काम करण्यासाठी २०१० साली महाराष्ट्रात 'शहरी गरीब महिलांचा आरोग्य हक्क मंच' स्थापन करण्यात आला होता. या मंचामार्फत शहरी गरीब महिलांच्या आरोग्याचे मुद्दे समजून घेत असताना, महिलांना गर्भपाताच्या सेवा नाकारल्या जातात हा मुद्दा वारंवार समोर येत होता. यामागे काय कारणे असावीत याबाबत काही खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांबरोबर चर्चा केली. यामध्ये लक्षात आले की, पी.सी.पी.एन.डी.टी. कायद्या अंतर्गत आपण अडकू अशी त्यांना भीती वाटत असल्यामुळे अनेक खाजगी वैद्यकीय व्यावसायिक गर्भपाताच्या सेवा नाकारतात. या सर्व प्राथमिक चर्चांनंतर लिंगनिदान आणि गर्भसमाप्ती या मुद्द्यामध्ये गल्लत केली जात आहे असे लक्षात आले मात्र याबद्दल फारशी चर्चा होत नव्हती म्हणून नक्की अडचण काय आहे हे समजून घेण्यासाठी एक सविस्तर अभ्यास करावा असा विचार सुरु झाला.

### पश्चिम महाराष्ट्रातील संशोधन:

सन २०१३ मध्ये सम्यक ने 'एशिया सेफ अबॉर्शन पार्टनरशिप' च्या मदतीने पश्चिम महाराष्ट्रातील १९ खाजगी स्त्रीरोग-तज्ज्ञांबरोबर एक गुणात्मक संशोधन केले. या संशोधनाचा हेतू वैद्यकीय व्यावसायिकांचे पी.सी.पी.एन.डी.टी आणि एम.टी.पी कायद्यांबद्दलचे ज्ञान, सरकारी यंत्रणेबरोबरचे त्यांचे अनुभव आणि गर्भपाताच्या सेवांना नकार देण्यामागची कारणे काय आहेत हे समजून घेणे, असा होता. या अभ्यासातून असे दिसून आले की अनेक सहभागींचे सरकारी यंत्रणेबरोबरचे अनुभव नकारात्मक आहेत, लिंग निवड प्रतिबंधक कायदा आणि सरकारी यंत्रणेमार्फत सुरु असलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या भीतीमुळे अनेक खाजगी वैद्यकीय व्यावसायिक गर्भपाताच्या सेवांना नकार देतात. गरोदरपणाच्या १२ आठवड्यानंतर सोनोग्राफीच्या माध्यमातून गर्भाचे लिंग काय आहे हे ओळखता येत असल्याने, या काळात मोठ्या प्रमाणावर (१९ पैकी १८ सहभागी) नकार दिला जातो असे लक्षात आले. याशिवाय प्रत्येक ठिकाणच्या वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनांनी काही नियमही बनवलेले आहेत. जसे की, जर एखादी महिला १२ आठवड्यानंतर गर्भपातासाठी आली तर संघटनेच्या अध्यक्षांचे किंवा तालुका आरोग्य अधिकाऱ्याचे पत्र आणण्यास सांगितले जाते आणि त्यानंतरच गर्भपाताची सेवा पुरविली जाते. पी.सी.पी.एन.डी.टी आणि एम.टी.पी कायद्याबाबत समज आणि अंमलबजावणीमध्ये मोठ्या प्रमाणावर गल्लत केली जात आहे हे वरील अभ्यासातून समजण्यास मदत झाली.

यानंतर ज्या महिलांना गर्भपाताच्या सेवा नाकारल्या जातात त्या पुढे काय मार्ग अवलंबतात आणि त्याची काय किंमत त्यांना मोजावी लागते हे समजून घेण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील १२ महिलांबरोबर दुसरा संशोधनपर अभ्यास केला गेला (सेवा नाकारल्या गेलेल्या महिलांपर्यंत पोचणे आणि त्यांनी या अभ्यासात सहभागी होणे, ही अतिशय अवघड गोष्ट होती). यामध्ये असे दिसून आले की, सरकारमान्य खाजगी किंवा सरकारी गर्भपात केंद्रांमधून गर्भपात करण्यास नकार मिळाला की, महिलांना नाईलाजाने नको असलेली गर्भधारणा सुरु ठेवावी लागते. याव्यतिरिक्त महिला असुरक्षित गर्भपाताचा मार्ग अवलंबतात, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होतो. याचबरोबर मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार महिलांना आणि त्यांच्या कुटुंबाला सोसावा लागतो. अनेकवेळा महिलांना एकट्यानेच या अडचणीला सामोरे जावे लागते आणि त्याचा त्रासही सहन करावा लागतो.

या संशोधनाचाच भाग म्हणून पी.सी.पी.एन.डी.टी कायद्याची अंमलबजावणी करण्याऱ्या अधिकाऱ्यांबरोबरही मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये अवैद्यकीय अधिकाऱ्यांनी (तहसीलदार) आम्हास वैद्यकीय माहिती फारशी नाही असे कारण सांगून मुलाखती देण्यास नकार दिला. अनेक अधिकारी गर्भपाताला नकार दिला जातो याबद्दल जाणून आहेत परंतु या मुद्द्याला यंत्रणांकडून फारसे महत्त्व दिले जात नाही असे दिसून आले.

सम्यक मार्फत करण्यात आलेल्या या अभ्यासाने लिंगनिदान आणि सुरक्षित गर्भपात या संदर्भात सध्या विविध पातळ्यांवर काय समज आणि परिस्थिती आहे हे समजायला खूप मदत झाली. याशिवाय या मुद्द्यावर आणखी काम करायचे असेल तर कोणकोणत्या घटकांबरोबर काम करण्याची गरज आहे, याची देखील स्पष्टता यायला मदत झाली. २०१४ मध्ये याच अभ्यासाच्या आधारावर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन विभागांमधील १० जिल्ह्यांमध्ये एका प्रकल्पाची सुरुवात झाली शिवाय सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधके याबद्दलची माहिती देण्यासाठी 'मर्जी हॉटलाईन' सुरु करण्यात आली.

### लिंगनिदानाला विरोध करत असतानाच सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळायला हव्यात या विषयाच्या समर्थनार्थ प्रकल्प:

सन २०१२ पासून सुरु करण्यात आलेल्या अभ्यासाच्या आधारावर ऑक्टोबर २०१४ मध्ये पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन विभागांमधील १० जील्ह्यांमध्ये लिंगनिदानाला विरोध करत असतानाच सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळायला हव्यात या विषयाच्या समर्थनार्थ एक प्रकल्प सुरु कारण्यात आला. या प्रकल्पांतर्गत सुरक्षित गर्भपाताच्या सेवा सर्व सरकारी केंद्रांमध्ये उपलब्ध व्हाव्यात, याचबरोबर खाजगी सेवा पुरविणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांनी गर्भसमाप्तीच्या सेवांना नकार देऊ नये, लिंगनिदान आणि गर्भपाताच्या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये गल्लत करू नये अशा काही मुद्द्यांवर सरकारी अधिकारी, स्वयंसेवी संस्था - संघटना, पत्रकार, खाजगी आणि सरकारी वैद्यकीय व्यावसायिक यांच्यासोबत विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला जात आहे.

लिंगनिदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळायला हव्यात आणि यासाठी पी.सी.पी.एन.डी.टी. आणि एम.टी.पी. या दोन्ही कायद्यांच्या बाबतीत होणारी गल्लत समजावून घेऊन या कायद्यांची अंमलबजावणी केली जावी आणि त्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

आज पर्यंत पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन विभागांमध्ये पुढील काही उपक्रम राबविण्यात आले.

१. सातारा, सांगली, कोल्हापूर, बीड, औरंगाबाद येथे सरकारी आणि खाजगी स्त्रीरोग तज्ज्ञ, सरकारी अधिकारी आणि महिला बाल विकास अधिकाऱ्यांबरोबर घेण्यात आलेल्या बैठकांमधून २३१ लोकांनी सहभाग घेतला.
२. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, बीड, औरंगाबाद, उस्मानाबाद, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमधील ८३ स्वयंसेवी संस्थांबरोबर या मुद्द्यावर चर्चा केली गेली.
३. दोन्ही विभागांमधून ३५ पत्रकारांबरोबर चर्चा करण्यात आली व व्यापक प्रमाणात या मुद्द्यांची माध्यमांद्वारे चर्चा करण्यात आली.

यापुढेही लिंगनिदानाला विरोध करत असताना महिलांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सम्यक मार्फत विविध पातळ्यांवर प्रयत्न चालूच रहातील. अर्थातच या प्रवासात आपण सगळे सहभागी असूच असा आम्हाला विश्वास वाटतो.

■■■

## आम्ही कुठं जायचं?

सविता आणि तिचा नवरा कंत्राटी कामगार होते. पुण्यामध्ये राहणारी ३० वर्षीय सविता सहाव्यांदा गरोदर होती. साधारणपणे अडीच महिने पूर्ण झाल्यावर ही गोष्ट तिच्या लक्षात आली. तिने जेव्हा ही गोष्ट तिच्या नवऱ्याला सांगितली तेव्हा 'तुझी तू निस्तर' असे म्हणून त्याने जबाबदारी झटकली. त्यानंतर सविता गावातील ग्रामिण रुग्णालयात गर्भपात करण्यासाठी गेली. सरकारी रुग्णालयातील डॉक्टरने गर्भपात करण्यास कायद्याने बंदी आहे असे सांगून गर्भपातास नकार दिला आणि खाजगी डॉक्टरने ८००० रुपयांची मागणी केली. गर्भपात करणे जर इतके अवघड असेल तर बाळंतपणच करावे या विचाराने सविताने गर्भधारणा चालू ठेवायचे ठरवले. मुलाखतीच्या वेळी ती सहा महिन्यांची गरोदर होती.

## मर्जी हॉटलाईन बद्दल

आपल्याकडे आजही अनेक महिलांना सुरक्षित गर्भपात कोठे करायचा, तो कसा होतो, गर्भधारणा होऊन नये म्हणून काय करायचे, याबद्दल माहिती नसते किंवा त्यांना मिळालेली माहिती योग्य असेलच असेही सांगता येत नाही. माहिती अभावी अनेक महिला गरोदरपण नको असेल तर असुरक्षित गर्भपाताच्या मार्गांचा अवलंब करतात. याचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. काही वेळेला हे प्रयत्न जीवावरही बेतू शकतात.

म्हणूनच महिलांना गर्भनिरोधक साधने आणि गर्भपातासंबंधी असणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी 'मर्जी' हॉटलाईन सुरू केली आहे. या हॉटलाईन मार्फत पुढील विषयांवर माहिती दिली जाते:

९०७५ ७६४ ७६३

मर्जी हॉटलाईन

सुरक्षित गर्भपात आणि गर्भनिरोधकांच्या माहितीसाठी

सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत

- गर्भनिरोधके: गर्भनिरोधकांचे प्रकार, कुठे मिळतात, कशी वापरायची इ.
- गर्भपाताबद्दल तांत्रिक महिती
- गर्भपाताच्या कायद्याबद्दल माहिती
- गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या सरकारमान्य व खाजगी गर्भपात केंद्रांबद्दल माहिती
- गरज पडल्यास सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या सरकारी किंवा खाजगी सेवांकडे गर्भपात मिळण्यासाठी संदर्भसेवा

ज्यांना गरज आहे अशा कोणीही महिला **सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते सायंकाळी ६** या वेळामध्ये फोन करू शकतात.

या नंबरवर फोन करणाऱ्या व्यक्तीचे नाव व इतर संपर्काबद्दलची माहिती संपूर्ण गोपनीय ठेवली जाते.

पुरुषही या हॉटलाईनवर फोन करू शकतात. त्यांना तांत्रिक माहिती दिली जाईल परंतु प्रत्यक्ष मदतीची गरज असेल तर यासंदर्भातील सर्व माहिती फक्त गरोदर महिलेलाच दिली जाते.

**तुम्ही पुढील नंबरवर आमच्याशी संपर्क साधू शकता: ९०७५ ७६४ ७६३**

**पुढील अंकात वाचा...!**
विवेचन : गर्भनिरोधके - डॉ. गोरख मंद्रुपकर
इतिहासाच्या झरोक्यातून : डॉ. र. धो. कर्वे यांचे विचार


मर्जी
माझ्या शरीरावर माझा हक्क
जुलै ते सप्टेंबर, २०१५

**कार्यकारी संपादक**
आनंद पवार

**संपादक मंडळ**
मिलिंद चव्हाण, डॉ. गोरख मंद्रुपकर
मनिषा तोकले, ज्योती भालकर,
प्रितम पोतदार

**मांडणी व छपाई**
संस्कृती डिझायनर्स, पुणे

खाजगी वितरणासाठी

**बुक-पोस्ट**



**प्रकाशक:**
**सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र**
बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
**फोन :** +९१ ९४०३५१६२३७ **ईमेल :** samyak.pune@gmail.com


सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

SAAF